# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४२**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: १०१, रूपये:- ५,००,००,०००/-**<br>**श्री. उत्तमराव जानकर** |
| (१) | ९४१ | १० | तिर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत नातपुते शहरातील पर्वतेश्वर मंदीर व गिरजापती महादेव मंदीर येथे भाविकांची मोठ्या प्रमाणात उत्सव व दर्शनासाठी रिघ असते. मंदीराचा विकास या ठिकाणी मुलभूत पाया सोयी-सुविधा निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. या निमित्ताने मंदीर परिसरात एक भक्त निवास बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२) | ९१६ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे श्री क्षेत्र अंबिका देवी मंदिर हे तिर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. याठिकाणी हजारो भाविक दरवर्षी भेट देत असून नवरात्रीमध्ये मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा केला जातो. या श्री. क्षेत्र अंबिका देवी मंदिरचा विकास व या ठिकाणी मुलभूत पाया सोयी-सुविधा निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे . तरी सांगोला येथील श्री.क्षेत्र अंबिका देवी मंदिरव परिसराचा तिर्थक्षेत्रास मान्यता देऊन विकास आराखड्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्यात यावी. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: १०६, रूपये:- ५,००,००,००,०००/-**<br>**श्री. हेमंत ओगले** |
| (३) | ९१७ | १० | श्रीरामपूर ( जि. अहिल्यानगर ) शहरातील कचरा उचलणाऱ्या गाड्या संबंधित ठेकेदाराकडून बंद करण्यात आल्याने शहरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग साठले असणे, तात्पुरत्या स्वरूपात नगरपरिषद श्रीरामपूर यांच्याकडून ट्रॅक्टर ट्रॉली चा वापर करून कचरा उचलणे सुरू आहे परंतु त्याची क्षमता अपुरी असणे, त्यामुळे श्रीरामपूर शहरातील आबालवृद्ध नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असणे,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. उत्तमराव जानकर** |
| (४) | ९४३ | १० | माळशिरस आणि नातेपुते शहराचे नागरिकरण झपाट्याने होत असल्याने नागरी भागात दैनंदिन दिवसात मोठ्या प्रमाणात हजारो मेट्रीक टन कचरा निर्माण होत आहे. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी नगरपंचायतीला घन कचरा व्यवस्थापन करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ९४४ | १० | माळशिरस नगरपंचायत आणि नातेपुते येथे शहराचे नागरीकरण झपाट्याने होत असल्याने नागरी भागात पाण्याची भीषण टंचाई सातत्याने होत असून नातेपुते शहरातील पाणी पुरवठा योजनेचे सक्षमीकरण करणे. नगर पंचायत हद्दीतील जल्शुद्धीकरण केंद्राचे नूतनीकरण तसेच स्थापत्य कामाचे नूतनीकरण करण्याची आवश्यता आहे. त्याच बरोबर पंपहाउस येथे संरक्षक भिंत बांधणे तसेच नातेपुते नगरपंचायत हद्दीतील विविध भागात जलवाहिनी टाकून याठिकाणी पाणी व्यवस्थापन करण्याकरिता राज्य शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (६) | ९१९ | १० | सांगोला शहराचे नागरीकरण झपाट्याने होत असल्याने नागरी भागात पाण्याची भीषण टंचाई सातत्याने होत असून सांगोला शहरातील चांडोलेवाडी पाणी पुरवठा योजना तसेच, वाढेगाव पाणीपुरवठा योजना या योजनेतून पाणीपुरवठा केला जातो परंतु सदर योजनेचे सक्षमीकरण करणे. नगर परिषद हद्दीतील जल शुध्दीकरण केंद्राचे नूतनीकरण तसेच स्थापत्य कामाचे नूतनीकरण करण्याची आवश्यता आहे. त्याच बरोबर इसबावी येथे पंपहाउस येथे संरक्षक भिंत बांधणे तसेच सांगोला नगरपरिषद हद्दीतील विविध भागात जलवाहिनी टाकून याठिकाणी पाणी व्यवस्थापन करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ९२१ | १० | सांगोला शहराचे नागरीकरण झपाट्याने होत असल्याने नागरी भागात दैनंदिन १० हजाराहून अधिक मेट्रिक टन कचरा निर्माण होत आहे. या घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी १ हजार लोकसंख्येमागे १ सफाई कामगार असून बाह्य यंत्रणे द्वारे १३० कंत्राटी कामगार काम करत आहेत. या १३० कंत्राटी कामगारांना सांगोला नगर परिषदे मध्ये कायम स्वरूपी सफाई कामगार म्हणून नियुक्ती दिल्यास बाह्य यंत्रणेवर होणारा खर्च कमी होऊन सदर कर्मचाऱ्याना कायम स्वरूपी सफाई कामगार म्हणून नियुक्ती देण्याबाबत राज्य शासनाने तात्काळ नव्याने आकृतीबंधास मान्यता देण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (८) | ९२३ | १० | सांगोला शहराचे नागरीकरण झपाट्याने झाले असल्याने नागरी भागात दैनंदिन १० हजाराहून अधिक मेट्रिक टन कचरा निर्माण होत आहे. या घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सांगोला नगरपरिषदेकडे ७ वाहने असून त्यांची काही वाहनांची क्षमता कालबाह्य झाले असून सांगोला नगर परिषदेला कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता १० वाहनांची आवश्यता आहे. तरी राज्य शासनाने सांगोला नगर परिषदेला |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता १० वाहनांची खरेदी करण्याकरिता निधीची तरतूद करण्यात यावी. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रोहित पाटील** |
| (९) | ९६१ | १०० | कवठेमहंकाळ (जि.सांगली)शहरात नगरपंचायती हद्दीतील प्रभाग क्र.४,१०,११,१४,१५ व १६ या प्रभागात पुरेश्या प्रमाणात पाणी पुरवठा करण्यात निर्माण होणारी अडचण,या प्रभागामध्ये सांडपाण्याची व्यवस्था नसणे अनेक ठिकाणी रस्ते खराब होऊन ते दुरुस्त करण्याकडे होणारे दुर्लक्ष. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१०) | ९२७ | १० | माझ्या उमरेड विधानसभा मतदारसंघात उमरेड नगरपरिषद असून, भिवापूर नगरपरिषद व कुही नगरपरिषद येथील शहरातील नागरिकांना चांगल्या आरोग्य दाई सुविधा उपलब्ध होण्यासाठी, शुद्ध पाणी, चांगली हवा, प्रदूषण मुक्त शहरे, सच्छ वस्त्या करण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाने मूलभूत सोई सुविधा उपलब्ध होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (११) | ८६९ | १० | मुंबई महापालिका अंतर्गत नगर विकास खात्यात पाईपलाईन चे काम देत असताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याची तक्रार या भागातील लोकप्रतिनिधींनी मुंबई महानगरपालिका व नगर विकास खात्याकडे माहे सप्टेंबर २०२५ मध्ये केली असणे, सदर तक्रारीच्या अनुषंगाने २५०० कोटीचे काम ३५०० कोटी पर्यंत गेले असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी नागरीकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबतची शासनस्तरावरुन चौकशी करुन दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: १०७, रूपये:- २०,००,००,००,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१२) | ८८० | १० | भंडारा जिल्हयात साकोली नगर परिषदेला स्वतंत्र प्रशासकीय ईमारत नसणे, नगरपरिषद साकोली व नगरपंचायत लाखनी व लाखांदूर शहरातील कव्हरसहीत गटा-यांचे बांधकाम नसणे, तसेच रहदारीचे रस्ते नसणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. वरुण सरदेसाई** |
| (१३) | ९७२ | १०० | "वांद्रे पूर्व विधानसभा रहिवासी क्षेत्रामध्ये १५० एम.एल.डी. पाण्याची आवश्यकता असताना फक्त ११५ एम.एल.डी. पाणी पुरवठा संपूर्ण वांद्रे पूर्व रहिवासी क्षेत्राकरिता |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | होणे, वांद्रे पूर्व च्या नवीन शासकीय वसाहत, गांधीनगर, कलानगर सह वांद्रे पूर्व च्या अन्य भागात अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होणे, तसेच गढूळ पाण्याच्या पुरवठ्यामुळ नागरिकांच्या आरोग्यावर याचा परिणाम होणे, परिणामी वांद्रे पूर्व च्या आवश्यक पाणी पुरवठ्याच्या प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: १०८, रूपये:- ३९,९४,००,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१४) | ९२५ | १० | माझ्या उमरेड विधानसभा मतदारसंघात १ नगरपरिषद व २ नगर पंचायत आहे त्यामध्ये उमरेड, कुही, भिवापूर येथील शहराची रस्त्यांची अवस्था फारशी चांगली नाही परिणामी स्थानिक स्वराज्य संस्था ही सक्षम नसल्यामुळे शासनाच्या नगरविकास विभागाने तातडीने निधीची तरतूद करावी. तसेच उमरेड शहरांचा व कुही भिवापूर येथील नागरी वस्तींच्या विकास कामासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ११४, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**श्री. हेमंत ओगले** |
| (१५) | ९१५ | १० | श्रीरामपूर (जि.अहिल्यानगर) शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांची अतिशय दुरावस्था झालेली असणे, नगरपरिषदेकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे सदर रस्त्यांची कामे करणे शक्य नाही असे नगरपालिका प्रशासनाचे म्हणणे असणे, खराब रस्त्यांमुळे श्रीरामपूर शहरातील आबालवृद्ध नागरिक, विद्यार्थी गर्भवती महिला रुग्ण यांना प्रवास करताना रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अतिशय त्रास होत असणे, रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे शहरातून होणारी अवजड वाहतूक आणि नागरिकांची दुचाकी, चारचाकी वाहने यांना वाहन चालवताना खूप कसरत करावी लागणे, रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागणे, रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे वारंवार अपघात होत असणे, या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजय चौधरी** |
| (१६) | ९०५ | १० | मुंबईमध्ये अनेक रस्ते ९ मीटरपेक्षा कमी रुंदीचे असल्याने अनेक ठिकाणी जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास रखडलेला आहे. रस्त्याची रुंदी कमी असल्याने सदर इमारतींचा पुनर्विकास होणे शक्य होत नाही. मुंबई विकास नियंत्रण नियमावली, २०३४ मध्ये ९ मीटरपेक्षा कमी रुंदी असलेल्या रस्त्यांची रुंदी ९ मीटर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करावी अशी तरतूद आहे. परंतु मुंबईतील अनेक रस्ते ९ मीटरपेक्षा कमी आहेत व त्यांची रस्ता रेषा ९ मीटर करण्यात आलेली नाही. परळ येथील गोखले सोसायटी लेन या रस्त्याची रुंदी ८ मीटर असून सदर रस्त्यावर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या मालमत्ता आहे. त्यांचा पुनर्विकास गेली अनेक वर्ष रखडलेला आहे. गोखले सोसायटी लेन, परळ या रस्त्यांची रस्ता रेषा किमान ९ मीटर करावी व सदर ठिकाणी असलेल्या महानगरपालिकेच्या मालमत्ता व सदर रस्त्यावरील उद्यानांचा सेटबॅक हस्तांतरीत करुन प्रत्यक्ष रस्ता ९ मीटर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ९०१ | १०० | मुंबई महानगरपालिकेमध्ये मध्यवर्ती खरेदी खाते (CPD) असून महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयातील वैद्यकीय साहित्य व यंत्र सामुग्री याविभागाच्या माध्यमातून खरेदी केली जाते.के.ई.एम. रुग्णालयातील एमआरआय मशीनची खरेदीची प्रक्रिया गेली 3-4 वर्षापासून सुरु आहे. त्याच प्रमाणे केईएम रुग्णालयातील वैद्यकीय साहित्याची खरेदी देखील या विभागामार्फत सुरु आहे. परंतु आजतागायत अनेक खरेदी प्रक्रिया पूर्ण झालेल्या नाहीत.मध्यवर्ती खरेदी खात्याच्या मनमानी कारभारामुळे वैद्यकीय साहित्य व यंत्रसामुग्रीच्या खरेदीला विलंब होतो. त्यामुळे महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपचारासाठी येणा-या रुग्णांना वैद्यकीय सेवा व उपचारापासून वंचित रहावे लागते. हजारो कोटी रुपयांचा अर्थसंकल्प असलेल्या महानगरपालिकेमध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत नाहीत, ही अत्यंत खेदाची व निंदणीय बाब आहे.मध्यवर्ती खरेदी खात्यातील कर्मचा-यांच्या व अधिकार-यांच्या मनमानीपणा व हलगर्जीपणामुळे रुग्णालयांना वैद्यकीय साहित्य वेळेत उपलब्ध होत नाही. महानगरपालिकेने मध्यवर्ती खरेदी खाते बंद करुन वैद्यकीय साहित्य व यंत्र सामुग्री खरेदी करण्याकरीता संबंधित रुग्णालय प्रशासनाला अधिकार द्यावेत याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. आदित्य ठाकरे** |
| (१८) | ९३२ | १० | मुंबईतील बहुतांश इमारती या MMRDA प्राधिकरण अंतर्गत बांधण्यात आल्या आहेत. One Time Policy नुसार या इमारतींची दुरुस्ती करण्यात येणार आहे. परंतु संरचनात्मक तपासणीसाठी निधीची तरतूद नसल्यामुळे दुरुस्ती करता येऊ शकत नाही. तरी, सदर इमारतींच्या संरचनात्मक तपासणीसाठी (Structural audit) वाढीव निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (१९) | ८८३ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील बृहन्मुंबई महानगरपालिका विकास आराखडा अंतर्गत येत असलेल्या ओबेराय मॉल गोरेगाव पूर्व ते पंप हाऊस पर्यंतचा रस्ता अत्यंत दयनीय झाला असून अद्याप या रस्त्याचे विकास काम पूर्ण न झाल्याने सदर स्थानिकांना मोठ्या प्रमाणात प्रवासाबाबत अडचणी निर्माण होत असून |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | स्थानिकांमध्ये वारंवार कोणत्या ना कोणत्या कारणाने रस्ता आढळून व एक्सीडेंट मोठ्या प्रमाणात होत आहेत सदर रस्ता १८.३० मीटर रुंदी असून या रस्त्यासाठी स्थानिकांनी अनेक वर्षापासून सातत्याने मागणी करून सदर रस्ता न झाल्याने सदर स्थानिकांच्या मागणी बाबत बृहमुंबई महानगरपालिकेने अद्याप कोणतेही कारवाई केलेली नसून याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना. |
| (२०) | ८८४ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील मोहन गोखले रोड ते अरुण कुमार वैद्य मार्गांना जोडणारा मुख्य रस्ता असून सदर रस्ता होणे अत्यंत गरजेचे असतानाही याबाबत शासनाकडे वारंवार मागणी करून शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेला स्थानिकांनी व प्रशासनाकडे निवेदना व पत्र व्यवहार करणे अद्याप या रस्त्याबाबत कोणती कारवाई केली नसल्याचे दिसून येत आहे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सदर रस्त्याचा कोणते सर्वे करण्यात आलेला नसून याबाबत लवकरात लवकर सगळे पूर्ण करून सदर रस्त्याला निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यासाठी याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना |
| (२१) | ८८५ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील हरी नगर बृहन्मुंबई महानगरपालिके अंतर्गत येत असलेले शाळांना तेथील आरक्षणा नुसार विकास करणे अपेक्षित असून अद्याप बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोणताही त्यांचा विकास आराखडा व विकासाचे धोरण निश्चित न करता सदर शाळांचे दुरुस्ती व त्याबाबतच्या कुठल्याही विकास कामे न झाल्याने सदर स्थानिक रहिवाशांनी मुलांच्या शिक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका व स्थानिक प्रशासनाकडे निवेदन व पत्र व्यवहार केलेला असून अद्याप त्यावरती बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणती सकारात्मक भूमिका घेतली नसल्याचे दिसून येत आहे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ८८६ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील शेरवाला येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत येत असलेले शाळेला विकसित करण्याकरिता स्थानिक रहिवाशांनी तसे मागणी व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले शेरवाला मनपा शाळेला अध्ययन / ग्रंथालयासह कक्षा सह अद्याधुनिक व सुविधा पूर्ण करण्याकरिता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ८८७ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदारसंघातील बृहन्मुंबई महानगरपालिका विकास आराखडा अंतर्गत शासनाच्या आरक्षित जागेवरती अनेक रस्ते व नाले असे विकास कामे होणे अत्यंत आवश्यक असून मतदारसंघातील अनेक रस्त्यांचे व इतर कामे प्रलंबित असून मतदारसंघातील रस्ते व इतर कामाबाबत स्थानिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला असून स्थानिक प्रशासन व बृहन्मुंबई महानगरपालिकेने अद्याप कोणतेही विकास कामांसाठी सकारात्मक भूमिका घेतली नसल्याने सदर मतदारसंघातील अनेक रस्त्यांचे व इतर कामे प्रलंबित आहेत त्यासाठी तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२४) | ८८९ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील वेरावल्ली वनस्पती उद्यान येथील स्थानिक विकास कामे होणे अत्यंत आवश्यक असून त्यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे अनेक वेळा निवेदनाच्या माध्यमातून पत्र व्यवहार करूनही अद्याप सदर विकास कामे न झाल्याने स्थानिकांमध्ये शासनाबाबत संभ्रम निर्माण झाला असून सदर विकास कामांसाठी नगर विकास विभागाच्या माध्यमातून शासनाने तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याकरिता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | ८९१ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील वेरावल येथे अतिरिक्त पाणीपुरवठा उपलब्ध होत असल्याने मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई निर्माण झाली असल्याने तिथल्या रहिवाशांना एक घेतो पाणीपुरवठा होण्याकरिता सदर वेरावली येथील रहिवाशांनी अनेक वेळा पाणीपुरवठा विभाग व मनपा यांना तक्रारी करणे अद्याप कोणतीही कारवाई यावरती न झाल्याने नवीन पाणीपुरवठा करण्याकरिता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२६) | ९४२ | १० | जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रामधील, प्राचीन व पुरातन वारसा असेलेली लेणी असून सन २००४ साली जोगेश्वरी गुंफेच्या परिसरातील अतिक्रमण विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्या याचिकेवर सुनावनी देताना सन २००७ मध्ये मुंबई महापालिका, महसुल विभाग आणि पोलिस विभाग यांचा समन्वय साधून भारतीय पुरातत्व विभागाने या लेणीच्या परिसरातील अतिक्रमण हटविण्याचे निर्देश दिले होते. त्या प्रमाणे मुंबई महानरपालिकेने अतिक्रमण अंशतः हटविले असून त्या सर्व झोपडयांचे पूनर्वसन करण्यात आले. सदर जोगेश्वरी गुंफेचा परिसर ताब्यात घेऊन त्या जागेवर प्राचीन व पूरातन लेण्यांना साजेसे थीमपार्क उभारण्याची मागणी सातत्याने करून ही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही जोगेश्वरी (पूर्व) भागातील पांडव कालीन गुंफा पाहण्यासाठी मुंबई शहराबरोबरच संपूर्ण महाराष्ट्रासह देश विदेशातील पर्यटक येत असतात त्यामुळे जोगेश्वरी गुंफेवरील मोकळया जागेवर थीमपार्क उभारल्यास प्राचीन गुफेचे संरक्षण व संवर्धन होऊन त्याच्या मुंबई शहराच्या लौकीकात अधिक भर पडेल.जोगेश्वरी (पूर्व) येथील गुंफेवरील मोकळया जागेत थीमपार्क बनवून गुंफेच्या सौंदर्यामध्ये व लौकीकामध्ये वाढ करणेसाठी संबधितांना आदेशित करण्याकरित याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२७) | ९०० | १० | वडगाव शेरी मतदारसंघातील येरवडा, यशवंत नगर, लक्ष्मीनगर, भाटवस्ती, येरवडा गावठाण, जय जवान नगर व इतर परिसर दाट लोकवस्तीचा असणे, सदर भागामध्ये ४० वर्षांपूर्वी टाकलेल्या बंदिस्त ड्रेनेज लाईन वारंवार तुंबून सांडपाणी रस्त्यावर आल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य पसरणे, सदरची बाब महापालिकेच्या निदर्शनास |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आणून देऊनही त्याकडे दुर्लक्ष होणे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, याकरिता शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून सदरची कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| (२८) | ९०२ | १० | धानोरी स.नं. ९ आणि लोहगाव स.नं. २९८ या दोन गावांच्या शिवे वरून जाणारा भारत माता रस्ता (शिवेचा) गेली अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, धानोरी आणि लोहगाव ही गावे १९९७ रोजी पुणे महापालिकेमध्ये समाविष्ट होणे, तदनंतर सदर गावांचा विकास आराखडा तयार करताना या दोन्ही गावांच्या शिवे वरून ६० मीटरचा रस्ता प्रस्तावित करण्यात येणे, परंतु सन १९९८- ९९ मध्ये लोहगाव हे पुणे महापालिकेतून वगळण्यात आल्याने लोहगाव हद्दीतला डीपी रस्ता रद्द होणे, यामुळे सदरचा रस्ता होण्यासाठी प्रचंड विलंब होणे, पर्यायाने या भागातील नागरिकांना रस्त्या अभावी हाल सोसावे लागणे, सध्या दोन्ही गावे पुणे महापालिकेमध्ये समाविष्ट असतानाही सदरचा रस्ता विकसित न होणे, याकरिता महापालिकेकडून कोणतीही कार्यवाही तसेच निधीची उपलब्धता न करणे, यामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२९) | ९०३ | १० | पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये म्हस्के वस्ती, कळस (PMC) ते दिघी (PCMC) या मध्यवर्ती भागामधील रस्ता अत्यंत अरुंद असल्यामुळे वाहतुकीचा वेग मोठ्या प्रमाणावर मंदावतो, परिणामी नागरिक व श्री क्षेत्र आळंदी ला जाणाऱ्या भाविकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होणे, उक्त भागात संरक्षण विभागाची जागा असल्यामुळे पर्यायी मार्ग उपलब्ध होत नाही तसेच पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या हद्दीचा प्रश्न असल्याने रुंदीकरणाचे काम कोणाकडून करावयाचे याबाबत मतभेद निर्माण होत असल्याचे दिसून येणे, यामुळे अतिशय महत्त्वाचे असलेल्या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम प्रलंबित राहणे, पूर्व पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांना जोडणारा हा प्रमुख प्रवेशमार्ग असून पुणे महानगर क्षेत्रातील वाढते नागरीकरण तसेच दरवर्षी श्री क्षेत्र आळंदी व पंढरपूरला जाणाऱ्या वाढत्या भाविकांच्या संख्येचा विचार करता रस्त्याचे रुंदीकरण अत्यंत अत्यावश्यक, सदर काम पूर्ण झाल्यास वाहतूक कोंडी टळून नागरिक, प्रवासी तसेच पालखी वारीतील भाविकांच्या सोयीस मोठा दिलासा मिळेल. सबब, दिघी (PCMC) ते म्हस्के वस्ती, कळस (PMC) या दरम्यान संरक्षण विभागाच्या हद्दीतील आवश्यक जागा हस्तांतरित करून संबंधित विभागांमार्फत रस्त्याचे तातडीने रुंदीकरण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३०) | ९०४ | १० | पुणे शहरासह वडगावशेरी मतदार संघातील येरवडा, चंदननगर, खराडी आणि परिसरांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढलेली लोकसंख्या, आयटी पार्क, शाळा-महाविद्यालये तसेच सतत वाढणारी वाहतूक यामुळे या भागात वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून खराडी– |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शिवणे रस्ता विकसित करण्याचा महत्त्वपूर्ण प्रकल्प पुणे मनपा कडून हाती घेण्यात येणे, सदर रस्त्याचे काम खराडी परिसरात बहुतांशी पूर्ण, मात्र मौजे वडगावशेरी गावातील वन विभागाच्या जमिनीचा ताबा पुणे महानगरपालिकेस न मिळाल्यामुळे रस्त्याचे काम प्रलंबित, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वडगावशेरी, खराडी तसेच संपूर्ण पुणे पूर्व भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून वाहतूक व्यवस्थापनात आमूलाग्र सुधारणा होईल, परंतु पुणे महानगरपालिका यांच्याकडून याबाबत मोठ्या प्रमाणात दिरंगाई, जागेचा ताबा न मिळाल्यामुळे रस्ता प्रकल्प रखडलेला असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागणे, सबब मौजे वडगावशेरी परिसरातील प्रलंबित रस्ता तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| (३१) | ९०६ | १० | पुणे नगर रस्ता येथून खराडी जकात नाका चुल मटन हॉटेल शेजारून लोहगाव स.नं.१२३, १२४, १२५, १२०, ११९, ११८, ११७ मधून तलेरा जमिनीच्या कडेने लोहगाव वाघोली रस्त्याला जोडणारा नियोजित २४ मीटर रुंद रस्ता २०५ अंतर्गत प्रस्तावित असणे, सदर रस्ता हा पुणे अहिल्यानगर महामार्ग तसेच लोहगाव- वाघोली-राहू मार्गांना जोडणारा महत्वाचा दुवा असणे, सदर रस्ता विकसित झाल्यास लाखो नागरिकांना याचा लाभ होणे, परंतु सदर रस्ता विकसित करण्यासाठी होत असलेल्या विलंबामुळे या भागातील लाखो नागरिकांना दळणवळणापासून वंचित राहावे लागणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३२) | ९०७ | १० | लोहगाव गावाचा २०१७ रोजी पुणे महानगरपालिकेमध्ये समावेश होणे, सदर गावाच्या वाढत्या नागरीकरणाचा विचार करता या भागामध्ये ड्रेनेज सारख्या मूलभूत सुविधेचा मोठ्या प्रमाणात अभाव, लोहगाव, कोपर आळी आठवडे बाजारासमोरील हॉली हॉक सोसायटीच्या मागील बाजूला परिसरातील सांडपाणी येऊन प्रचंड प्रमाणात साचणे, सदर परिसरात महापालिकेकडून ड्रेनेज लाईन मुख्य लाईनला जोडली नसल्यामुळे सांडपाणी सोसायटीच्या लगत जमा झाल्यामुळे सोसायटीतील तसेच परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, याबाबत महापालिकेला तातडीने कार्यवाही करणेसाठी वेळोवेळी निवेदन तसेच मागणी करूनही त्यावर कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना न होणे किंवा निधी उपलब्ध न करणे, सबब सदर सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३३) | ९०८ | १० | वडगाव शेरी मतदार संघातील विश्रांतवाडी - धानोरी, (धानोरी जकात नाक्यामार्गे) लोहगाव वाघोलीला जाणारा रस्ता हा वाहतुकीसाठी अतिशय महत्त्वाचा, सदर रस्त्यावर दररोज लाखोच्या संख्येने वाहनांची ये जा असणे, सदर रस्त्याला परिसरात इतर पर्यायी रस्ता नसल्यामुळे या रस्त्यावर प्रचंड प्रमाणात वाहतुकीचा ताण या भागात दररोज होणारी वाहतूक कोंडी त्यामुळे नागरिकांना सोसावा लागणारा आर्थिक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | व मानसिक ताण, परंतु सदर पुणे मनपा विकास आराखड्यातील रस्ता धानोरी हद्दीत रुंदीकरणा अभावी गेली अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, त्यामुळे सदरचा अरुंद रस्ता तातडीने रुंद करणे आवश्यक, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३४) | ९१० | १० | लोहगाव हे पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट होऊन जवळपास आठ वर्षे पूर्ण झालेले असूनही लोहगाव हे मूलभूत सुविधांपासून वंचित असणे, लोहगाव पोलीस चौकी, बस स्टॉप मुख्य चौक येथे मोठ्या प्रमाणात रहदारी असून दररोज लाखोच्या संख्येने नागरिक या ठिकाणाहून ये-जा करणे, परंतु याठिकाणी महिला व पुरुष यांचे साठी स्वच्छतागृह कुठेही उपलब्ध नसल्यामुळे त्यांची प्रचंड गैरसोय, किंबहुना महिलांची मोठ्या प्रमाणात कुचंबना होणे, सदर मुख्य बस स्टॉप चौकामध्ये उपलब्ध असलेल्या जागेमध्ये महिला व पुरुष स्वच्छतागृह उभारण्यासाठी वारंवार मागणी करूनही त्याबाबत पुणे महानगरपालिकेकडून याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | ९३१ | १० | वडगाव शेरी विधानसभा मतदार संघात येरवडा, शांतीनगर, जाधवनगर, कळस, धानोरी लक्ष्मीनगर, मयूर किलबिल सोसायटी परिसर, लोहगाव रस्त्यावरील धानोरी जकात नाका, पोरवाल रोड परिसर, लोहगाव वाघोली रस्त्यावरील दादाची वस्ती, कर्मभूमी योजना नगर, पुणे नगर रस्त्यालगत खांदवे नगर, साई गणेश पार्क वडगाव शेरी, साईनाथ नगर करण आशियाना सोसायटी परिसर सेंट अर्नोल्ड शाळा परिसर या भागामध्ये पावसाळयामध्ये पावसाचे पाणी येऊन पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होते नागरिकांची घरे पाण्यात जाणे सदर भागांमध्ये नाला अरुंद व नाला चॅनेलाईजिन केला नसल्यामुळे पाण्याचा प्रवाह नागरिकांच्या घरामध्ये येऊन नागरिकांच्या साहित्याचे नुकसान होणे, त्यामुळे असंख्य नागरिकांना इतर ठिकाणी स्थलांतरित करावे लागणे, सदर ठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी सातत्याने मागणी करूनही विलंब होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३६) | ८९४ | १० | उमरेड (जि.नागपूर) येथील पंडित दीनदयाल उपाध्याय सभागृह/नाटयगृहावर कोटयावधी खर्च होऊनही येथे तांत्रिक आणि मुलभूत सुविधा, ध्वनी व विद्युत व्यवस्था, प्रकाश व्यवस्था, वातानुकूल यंत्रणा बंद, नादुरुस्त आहे. यामुळे येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्यावसायिक नाटयप्रयोग होणे अशक्य झाले आहे, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथे व्यावसायिक नाटयप्रयोगांना आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. सुनील राऊत** |
| (३७) | ८७६ | १०० | विक्रोळी पूर्व मधील टागोरनगर येथील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे.या भागातील १. कै.हिरे मार्ग टागोर इमारत क्र २१ ते २६ रस्ता, २. स्वामीनारायण मार्ग टागोर नगर इमारत क्र ८ ते १ रस्ता, ३. पगारे मार्ग टागोर नगर इमारत क्र.३० ते ३४ रस्ता, ४. राम हजारे मार्ग मच्छिमार्केट पासून ते खामकर मसाला घरापर्यत रस्ता, ५. राम हजारे मार्ग परेश पारकर मार्ग, ६. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्टेशन रस्ता, ७. आबा हरि राणे मार्ग टागोर नगर रस्ता, आदि रस्ते अत्यंत नादुरुस्त झाल्यामुळे पावसाळयात नागरिकांना चिखलातून वाट काढत जावे लागणार आहे.उक्त रस्ते दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधीत विभागाकडे पत्रव्यवहार करुनही अदयाप दुरुस्ती झालेल नाही.सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | ८७७ | १०० | मुंबईतील विक्रोळी पूर्व कन्नमवार नगर व टागोरनगर भागात जलवाहिन्या व मलनिस्सारण वाहिन्या जीर्ण झालेल्या असणे, सदर जलवाहिन्या व मलनिस्सारण वाहिन्या 50 ते 60 वर्षापूर्वीच्या असल्याने त्याची क्षमता मर्यादीत असणे, पावसाळयात मलनिस्सारण वाहिन्या ओव्हरप्लो होऊन सांडपाणी रस्त्यांवर येऊन दुर्गंधी पसरत असणे, विक्रोळी पूर्व कन्नमवार नगर व टागोरनगर भागात म्हाडा वसाहती असून या जलवाहिन्या व मलनिस्सारण वाहिन्याची वेळेवर दुरुस्ती म्हाडाकडून होत नसल्याने नागरिकांना जीर्ण जलवाहिन्यामधून दुषीत पाणी पुरवठा होत असणे,नागरिकांचे आरोग्य दुषित पाण्यामुळे बिघडणे, पूर्वी म्हाडा वसाहती हया चाळी व बैठी घरे होती त्यामुळे त्यावेळी मलनिस्सारण लाईनची आखणीदेखील त्याप्रमाणे असणे, या भागात मोठया प्रमाणात पुनर्विकास होत असल्याने सदर वाहिन्या दुरुस्ती व बदलण्याबाबत लोकप्रतिनिधीनी अनेकवेळा पत्रव्यवहार करुनही कोणताच प्रतिसाद म्हाडाकडून मिळालेला नसणे,त्याकरिता या म्हाडाच्या अखत्यारित असलेल्या जलवाहिन्या व मलनिस्सारण वाहिन्या महापालिकेकडे वर्ग करण्याची नितांत आवश्यकता, यासंदर्भात बैठका होऊनही म्हाडाकडून जाणीवपूर्वक महापालिकेकडे वर्ग करण्यास होत असलेली टाळाटाळ, प्रत्येक अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधुनही कोणतीच कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने तात्काळ निर्णय घेऊन जलवाहिन्या व मलनिस्सारण वाहिन्या महापालिकेकडे वर्ग करुन दुरुस्ती / बदलण्याची कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३९) | ८७८ | १०० | भांडूप (पूर्व ) येथील जय अंबेनगर येथील ६० वर्षापूर्वी बांधण्यात आलेला साकव तुटलेला असल्याने त्याठिकाणी नवीन साकव बांधण्याकरिता निधी उपलब्ध नसल्याने बांधण्यात आलेला नसणे, सदरहू साकवावरुन विदयार्थी, रहिवाशी ये-जा करित असल्याने साकवाअभावी त्यांची गैरसोय होत असणे, यासंदर्भात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | लोकप्रतिनिधीनी दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजी मा.उपायुक्त ( पायाभुत सुविधा ) मुंबई महानगरपालिका व मा.प्रमुख अभियंता (पुल ) वरळी यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही साकवाकरिता निधी उपलब्ध न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (४०) | ८८८ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथे नगरपरिषद अंतर्गत सांस्कृतिक सभागृहासाठी निधी मंजूर करण्यात आलेले होते त्या अनुषंगाने आठ कोटी रुपयांची रक्कम देण्यात आलेली होती, सदर सांस्कृतिक सभागृहाचे काम त्याच्यानंतर सुरू करण्यात आलेले होते, परंतु गेल्या तीन वर्षापासून सातत्याने स्थानिक लोकप्रतिनिधी उर्वरित आठ कोटी रुपये निधीची मागणी शासनाकडे करत आहे ज्याच्यामुळे हे सामाजिक व सांस्कृतिक सभागृह संपूर्णपणे तयार होईल व या भागातील नागरिकांना त्याचा उपयोग पडेल त्याचप्रमाणे सांस्कृतिक चळवणीला एक मोठा आयन तयार होईल परंतु शासन या उरलेल्या आठ कोटी रुपयांच्या निधी देत नाहीये त्यामुळे सदर बांधकाम अपुरे अवस्थेत पडलेला आहे व कालांतराने याची व्याप्ती सुद्धा वाढू शकते तरी शासनाने सदर उरलेल्या निधी तातडीने देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४१) | ८९० | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी नगरपरिषद क्षेत्रामध्ये नगरपालिका वैशिष्ट्यपूर्ण निधीमधून शहरी बागेचे काम सुरू करण्यात आलेला होता व त्यासाठी शासनाकडून १.५० कोटी रुपयाचा निधी वितरित करण्यात आलेला होता, सदर बागेचे काम पूर्ण होण्यासाठी नगरपरिषद व स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार दोन कोटी रुपयांची निधीची मागणी गेल्या तीन वर्षापासून करत आहे परंतु शासन अप्राप्त निधी देण्यासाठी कोणतीही कारवाई करत नाहीये, यामुळे या बागेचे काम अपुऱ्या परिस्थितीत आहे जर वेळी त्याला निधी नाही दिला तर त्याचे झालेलं काम पण काल्यबाहेर होऊन जाणार आहे व त्याच्या निधीची उपलब्धता वाढणार आहे तरी शासनाने उर्वरित दोन कोटीच्या निधी देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रईस शेख** |
| (४२) | ९७४ | १०० | भिवंडी शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ११५ मौजे चाविंद्रा सर्वे नं ७ पै.१०६ पै ही सिटी पार्ककरिता आरक्षित असलेल्या जागेवरील कचरा डपिंग ग्राऊंड करण्यात आलेले आहे.मनपा क्षेत्रातील दैनंदिन जमा होणारा कचरा अनधिकृतपणे याठिकाणी जमा केला जात आहे.सदर जागा ही सिटी पार्ककरिता आरक्षित असतांना गेल्या २० वर्षापासून यासंदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही .सदर जागेवर कचरा जमा होत असल्याने चाविंद्रा, पोगाव,रामनगर,गायत्रीनगर,नागांव येथील नागरिकांनी तीव्र विरोध ,नागरिकांनी संबंधित विभागाशी पत्रव्यवहार केला असता यासंदर्भात तत्कालीन प्रशासक तथा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आयुक्त यांनी नागरिकासमवेत महानगरपालिकेमध्ये बैठक घेऊन डपिंग ग्राऊड बंद करण्याबाबत दिनांक २/११/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत पर्यायी व्यवस्था होईपर्यंत करण्यात येईल आश्वासन दिले .परंतु आज २०२५ सुरु झाले तरीही डपिंग ग्राऊड अदयापी बंद करण्यात आलेले नसणे, त्यामुळे नागरिक संतप्त झाले असून जर डपिंग ग्राऊड बंद न झाल्यास त्यांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला आहे.याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घाऊन सदरहू डपिंग ग्राऊड तात्काळ बंद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन** **जितेंद्र भोळे,**
**नागपूर,** **सचिव-१,**
**दिनांक : ९ डिसेंबर, २०२५** **महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर